# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे, एम. ए.

वर्ष २६, अंक ८ वा    १५ फेब्रुआरी १९५३    किंमत ४ आणे



# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | विवाहसंस्थेवर आधुनिक आक्षेप-४ ... | १४५ |
| २. | सुखाचे संसार ... ... ... ... | १४९ |
| ३. | गांधीवादाची दुर्दशा ... ... ... | १५४ |
| ४. | प्रियकराला विषप्रयोगाने मारणारी मॅदलेन ... | १५६ |
| ५. | ग्रंथपरीक्षण ... ... ... ... | १५९ |
| ६. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १६० |
| ७. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १६१ |



## अेजंटांचीं नांवें

**मुंबई** : श्री. बाबूराव बागवे, न्यूज एजंट, खटाववाडी, गिरगांव.

**पुणें** : अेल्. के. जोशी, बुकसेलर.
डी. अेच्. शहा, बुकसेलर.

**अहमदनगर** : पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी** : के. एस्. बळगुर्गी

**आदिलाबाद** : वैद्य ब्रदर्स.

**कुमठा** : आर्. एम्. कामत

**गोकाक** : पी. एम्. शिरगांवकर


**स मा ज स्वा स्थ्य** मासिक

यांत वाचकांच्या कामविषयक अडचणींना उत्तरें दिलेलीं असतात, परंतु कायद्याच्या अडाणीपणामुळें सर्वच प्रश्नांना मासिकांत उत्तरें देतां येत नाहीत. ज्यांना खाजगी पत्राने उत्तर पाहिजे असेल, त्यांनी आगाऊ वीस रुपये पाठवावे, म्हणजे रजिस्टर पोस्टाने उत्तर मिळेल. **संपादक**.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# विवाहसंस्थेवर आधुनिक आक्षेप–४

फ्रेंचमध्यें अेक म्हण आहे की संसार सुरळीत चालायला पाहिजे असेल, तर नवरा बहिरा आणि बायको आंधळी असावी. याचा अर्थ असा की दोघांनीही सहनशीलता दाखवावी. पण अलीकडे या सहनशीलतेची प्रवृत्ति कमी कमी होत आहे. ज्या काळीं लोक परमार्थाकडेच लक्ष देत होते आणि संसारांत सुख व्हायचेंच नाही असें धरून चालत होते, तेव्हां त्यांची बंड करण्याची फारशी प्रवृत्ति नव्हती. परंतु आतां परमार्थाला कोणी विचारीत नाही आणि अैहिक सुखालाच लोक महत्व देऊं लागले आहेत. तेव्हां विवाहासारखी दुसरी शिक्षा नाही असें पुष्कळांना वाटूं लागलें आहे. गेल्या शतकांत आंपेर नांवाचा जो मोठा फ्रेंच गणिती होऊन गेला, त्याने उत्तरवयांत विधुर झाल्यावर पुन्हा तरुणीशीं विवाह करण्याचा मूर्खपणा केला, आणि पहिल्याच रात्रीं त्याला नव्या बायकोने सांगितलें की मला मुलें नको आहेत. परंतु आंपेर हा जुन्या मताचा होता, तेव्हां मुद्दाम म्हणा किंवा अवधान न राहिल्यामुळें म्हणा, तो जरूर तितकी खबरदारी घ्यायला विसरला आणि पत्नी गरोदर झाली. लग्न करतांना बायकोने घरांतील सामान आणि त्याची सर्व पुंजी आपल्या नांवाने करून घेतली होती आणि त्याने असा विश्वासघात केल्याबद्दल तिने त्याला घरांतून हांकून दिलें आणि तिला झालेली मुलगी मात्र त्याच्या गळ्यांत पडली. त्याने कित्येक वर्षेपर्यंत तडजोड करण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही आणि तो पश्चात्ताप करीत बसला.

अेका अिंग्रज न्यायाधीशाने म्हटलें आहे की एखाद्याने पाळलेल्या माकडाच्या माकडचेष्टांबद्दल जसा तो जबाबदार असतो, तसाच बायकोच्या कृत्यांबद्दलही असतो. बायकांच्या मूर्खपणामुळें किंवा आततायीपणामुळें कित्येक उदयोन्मुख पुरुषांचा नाश झाल्याच्या हकीकती थोड्या नाहीत. अर्थात् कित्येकांना बायकांची मदतही झालेली आहे यांत शंका नाही, पण आपली स्वतःची स्थिति काय होअील याचा भरंवसा कोणाला बाळगतां येअील ? याउलट कित्येक बायकांचा लग्नामुळें नाश होतो हेंही खरें, पण ही दुसरी बाजूही विवाहसंस्थेला पोषक नाही. विवाह म्हणजे अेक सोडत आहे हें आतां सर्वमान्य झालेलें आहे. कित्येकांना सोडतींत मोठीं बक्षिसें मिळतात, पण बहुतेकांचें त्यांत नुकसानच होतें. तशीच गोष्ट विवाहाची आहे. ज्यांचें विवाहाने नुकसान होतें असेच फार, ज्यांना तो मानवतो असे थोडे.

कामवासनेच्या बाबतींत वयाचा प्रश्न महत्वाचा असतो, हें पुष्कळांना कळत नाही. हा शरीरशास्त्राचा प्रश्न आहे आणि त्यांत नीतिनियमांचा संबंध नाही. स्त्री नेहमी पुरुषापेक्षां लवकर म्हातारी होते आणि ती कितीही सुंदर असली तरी कांही वयापलीकडे ती पुरुषाचें समाधान करूं शकत नाही. यामुळेंच पुरुषाचें वय झालें तरीही त्याला तरुण स्त्रीची अिच्छा असते आणि ही अिच्छा पूर्ण न झाली तर तो नेहमी अतृप्त राहतो. स्वतःच्या वयातीत स्त्रीशीं जरी त्याने संबंध ठेवला, तरी तो केवळ भुकेला कोंडा अशा स्वरूपाचा असतो आणि तिची नेहमीची संवय झाल्यामुळें तिचें आकर्षण आणखी कमी होतें. यामुळेंच पुष्कळांना स्वतःच्या बायकोपेक्षां अितरांच्या बायका अधिक सुंदर दिसतात. स्वतःला त्यांत बिलकुल समाधान वाटत नसतांही कित्येक पुरुष पत्नीच्या समाधानाकरतां समागम पार पाडतात, पण पुष्कळांना तें अशक्य होतें आणि ते पत्नीपुरते नपुंसक होतात. विवाहसंस्थेंत या शारीरिक सत्याला मान्यता नसते. पूर्वी हिंदूंना जास्त बायका करतां येत असत, तेव्हां ज्यांना परवडेल ते अेक बायको वयातीत झाल्यावर अेखादी नवी

तरुण बायको करीत असत, आणि तिचें समाधान करण्याची ताकतही त्यांना असे. पण आतां कायद्याने तें अशक्य केलें आहे. विवाहांत असमाधान वाटण्याचें हें अेक मोठें कारण आहे. पूर्वीच्या बायकांनाही हें समजत असे आणि त्या नवऱ्याचें दुसरें लग्न करून द्यायला मदतही करीत असत. हल्लीच्या बायका आपले हक्क घेऊन बसतात, पण त्यांनाही त्यांत सुख मिळत नाही. हक्क कायद्याने मिळतात, पण प्रत्यक्षांत या कायदेशीर हक्कांना किंमत नसते. दुसरें लग्न न करतां आलें तरी पुरुष दुसरीकडे जात नाहीत असें नाही. जुन्या बायकांना मुलें झालीं म्हणजे त्यांतच त्या म्हातारपणीं समाधान मानीत असत आणि नवऱ्याला जखडून ठेवण्याचा फोल प्रयत्न करीत नसत.

जेथें विवाहाला धार्मिक महत्व असतें, तेथें विवाहाच्या मंत्रांमधें वधूवरांना अेकत्र बांधण्याची शक्ति असते असें मानतात आणि क्रिस्ती धर्मांत जरी लग्न लावणारा पाद्रीच असतो, तरी तें अीश्वर लावतो असें मानतात आणि म्हणूनच माणसाला तें मोडतां येत नाही असें ते म्हणतात आणि घटस्फोटाला विरोध करतात. परंतु आतां नोंदणीविवाह रूढ झाल्यापासून विवाहाचें धार्मिक महत्व नाहीसें झालें आणि म्हणूनच घटस्फोटाचा हक्क अधिकाधिक मान्य होत आहे. तरीपण अजूनही तो करार मानला जात नाही, कारण तो करार असता तर केवळ दोघांच्या संमतीने तो मोडतां आला असता, किंवा अेकाच्या मतानेही तो मोडतां आला असता. वास्तविक दोघांचीही संमति असेल तरच अशा प्रकारचा करार चालू राहील, ती नसेल तर तो रद्द ठरला पाहिजे. नपेक्षां अेकाला तो उघडपणें मोडतां न आला तरी तो चोरून मोडील. नोंदणीविवाहाचा परिणामही कांही अंशीं धार्मिक विवाहासारखाच आहे, कारण विवाहापूर्वी ज्या स्त्रीपुरुषांचा संबंध समाजांत गर्ह्य मानला जातो, त्याच दोघांचा तसाच संबंध विवाहानंतर समाजांत मान्यता पावतो. म्हणजे नोंदणीचाही जादूच्या कांडीसारखा परिणाम होतो असें दिसतें, म्हणजे धार्मिक वृत्ति नोंदणीविवाहांतही कायम राहते.

वास्तविक मंत्रांचा किंवा नोंदणीचा कोणताही शारीरिक परिणाम होत नाहीं आणि समागमाच्या परिणामांत कोणताही फरक होत नाही. मग हा फरक कां मानावा? मंत्रांनंतर किंवा नोंदणीनंतर झालेलें मूल औरस होतें, अेरवीं तें अनौरस असतें, हा फरक कां? तो केवळ मानीव आहे, खरा नाही, हें उघड आहे. विवाहाने स्त्री ही पुरुषाची मालमत्ता होते आणि त्यापूर्वी ती मालमत्ता नसते आणि समागमाला नकार देऊं शकते, हा फरक मात्र महत्वाचा आहे, पण तो न्याय्य आहे असें कोणाही विचारवंताला वाटणार नाही. पण कायदा मात्र तसा आहे.

नोंदणीविवाहाने लग्नाचें समारंभाचें स्वरूप मात्र नाहीसें झालें. वधूवरांचें सार्वजनिक प्रदर्शन करून हीं दोन माणसें आजपासून अेकमेकांशीं समागम करणार आहेत अशी जाहिरात पूर्वीच्या ताशेवाजंत्रीं लावून केलेल्या लग्नसमारंभांत होत असे, तशी नोंदणीविवाहांत होत नाही याबद्दल कोणाला वाअीट वाटण्याचें कारण नाही. पूर्वीच्या पद्धतीच्या लग्नाच्या निमंत्रणपत्रिकेंतही दोघांच्या शरीरसंबंधाचा उल्लेख असे आणि कृष्णराव मराठ्यांनी जरी त्याला अश्लील म्हटलें नाही, तरी पुष्कळांना यांत सभ्यतेचा भंग होतो असें वाटतें. या खाजगी गोष्टी आहेत, त्यांचें प्रदर्शन करण्याचें कारण काय?

विवाहाविरुद्ध आणखी अेक आक्षेप म्हणजे ज्यांना कोणत्याही कारणाने विवाह शक्य नसेल त्यांनी समागम करूं नये, ही समाजाची अपेक्षा. हा धडधडीत अन्याय आहे हें काय सांगायला पाहिजे? आजकालच्या बिकट आर्थिक परिस्थितींत तर बायकोला पोसण्याची जबाबदारी अंगावर घेणें ज्यांना परवडणार नाही, अशांची संख्या पुष्कळच वाढली आहे. वेश्या सर्व समाजांत असतात, पण त्यांचा उपयोग उघडपणें करतां येत नाही, कारण तो समाजाला मान्य नाहीं. हा अन्याय अितक्या लोकांनी कां सहन करावा? असा उघड अन्याय करणाऱ्या संस्थेबद्दल कोणाला कां आदर वाटावा? शिवाय ज्यांना विवाहाची अिच्छा असेल, अशांना देखील समाजाची परवानगी मिळतेच असें नाही. ओनीडा नांवाच्या अमेरिकन संस्थानांत ६५ वर्षांचा

मनुष्य सोळा वर्षांच्या मुलीशीं तिच्या संमतीने विवाह करूं अिच्छीत होता, पण त्याला परवानगी मिळाली नाही, म्हणजे दोघांची संमति असून देखील विवाह करतां आला नाही. बडोदा संस्थानांत असा कायदा होता की वधूचें वय अठराच्या आंत असेल, तर तिला ४५ किंवा अधिक वयाच्या वराशीं कायदेशीर विवाह करतां येणार नाही, मग तिची संमति असली तरी तो बेकायदाच. अशा तऱ्हेचीं बंधनें आधुनिक माणसांनी कां सहन करावीं? पण ज्या देशांत विवाहाशिवाय समागम अशक्य असतो, किंवा सोंवळ्या लोकांना तसें वाटतें, त्या देशांत असे हाल सहन करण्याचा प्रसंग पुष्कळांवर येतो. विवाहसंस्था म्हटली की अशीं बंधनें येणारच. तीं काढून टाकायचीं म्हटलीं म्हणजे विवाहसंस्थाच रद्द केल्यासारखें होअील, पण अेरवीं हा जुलूम सहन करावा लागतो. अशा स्थितींत या संस्थेला लोकांनी कां उराशीं बाळगावी?

---

# सुखाचे संसार

लेखक, मनोहर हासूजी डफळे

दोन वर्षांनंतर हेमा आपल्या आवडत्या थोरल्या वहिणीकडे-विमलकडे-माहेरपणास आली होती. त्या दोघींचें गाढ प्रेम होतें. हेमा लहान असतांनाच त्यांची आअी निवर्तली. त्यानंतर तिचें पालन मातेच्या ममतेने विमलनेच केलें होतें.

त्यांचे वडील माध्यमिक शाळेंत अध्यापक होते. विमल मॅट्रिक झाल्यावर तिचें रीतसर लग्न झालें. तिचा पति अेक लहानसाच सुखवस्तु जमीनदार होता. त्यानंतर त्यांचे वडील मुख्याध्यापक झाले, यामुळें त्यांनी हेमाला ग्रॅजुअेट केली आणि तिला रेसिडेंट मॅजिस्ट्रेट पति लाभला. विमलला अस्मान ठेंगणें वाटत होतें हेमाचें हें भाग्य पाहून.

अर्थात् दरवर्षी हेमा विमलकडे विश्रांतीसाठी यावी हें साहजिक होतें. पण ती या खेंपला उशिरां आली हें विमलला लागून राहिलें होतें. त्याही-

पेक्षां हेमाने अेक पत्र लिहिलें होतें, त्यांतील ‘ताअी, बाळासाहेबांना जप, लक्ष ठेव त्यांच्यावर, विश्वास फार ठेवूं नकोस बरं. माणसं दिसतात तशीं नसतात !’ या वाक्यांनी विमल हैराण झाली होती. बाळासाहेबांच्या निर्मल चारित्र्याबाबत तिने व्यक्त केलेला हा संशय साध्वी विमलला सहन झाला नव्हता.

त्यांचें त्याबाबत बोलणें निघालें. ‘बाळासाहेब वेदांती आहेत तत्वज्ञानावर प्रवचनें देतात, शुचिर्भूत वागतात, त्यावर तूं फसतेस, ताअी ! हेमा म्हणाली.

‘तुला त्यांचा अनुभव नाही, तूं ओळखलें नाहीस त्यांना. कांहींच्या बाहींच काय बोलतेस तूं हेमा ?’

त्यावर थोडेंसें बोलणें झालें. हेमाने पड खाल्ली, पण ती स्वस्थ बसणारी तरुणी नव्हती. हेमा अभिमानी होती व दिसायला सुरेखच होती. शिवाय सडपातळ रहावें म्हणून ती नित्य व्यायाम घेत असे आणि अितर ग्रॅजुअेट तरुणींप्रमाणें ती किंचित् नटवीही होती. विमल गोरीपान होती, पण घरच्या पारंपरिक वातावरणांत ती सनातनी वृत्तीने वागत असे हें साहजिकच होतें. त्यांत तिला दोन मुलेंही होऊन गेलीं व ती स्थूल पण झाली होती.

सायंकाळीं बाळासाहेब घरीं आले तेव्हां अितक्या दिवसांनी आलेल्या हेमाशीं ते मनमोकळेपणाने बोलले, पण ती फारशी बोलली नाही.

जेवणें झालीं, निजानीज झाली. मध्यरात्रीला हेमा जागी झाली आणि उकडतें, हवा येत नाही, म्हणून विमलला उठवून तिने तक्रार केली. शेवटीं हेमाच्या हट्टावरून विमल तिच्या पलंगावर झोपली व ती विमलच्या अंथरुणावर तिच्या मुलांशेजारीं निजली.

रात्रीं दीडदोनच्या सुमारास विमल घाबरून जागी झाली, तोंच समोर बाळासाहेबांना उभे पाहून ती आश्चर्यचकित झाली. त्यांच्या संवयी तिला माहीत नव्हत्या का ? पण घरांत हेमा असतांना ते कधींच माडीवर

येत नसत. आणि ते आज अशा वेळीं आले– कां ? थोडा वेळ स्तंभित झालेले बाळासाहेब तिच्या पलंगावर बसले. ' हें काय हें ? बाजूला हेमा निजली आहे, ' विमल कुजबुजली. ते तिचे पति होते, त्यांनी तिच्या या हरकतीला उत्तर दिलें नाही. विमलचा नाअिलाज झाला.

दुसऱ्या दिवशीं हेमा उशिरां उठून खालीं आली. विमलने चहा तयार केला होता.

' ताअी, आज तूं बरीच खुषींत दिसतेस ! ' हेमाच्या बोलण्यांतील गर्भितार्थ विमलला जाणवला नाही.

' कां ग ? मी खुषींत नसायला काय झालें ? '

' बाळासाहेब कोठे आहेत ? ' हेमाने सहज विचारलें.

' ते कुठे बाहेर गेलेत, कां ग ? '

' भारीच प्रेम आहे त्यांचें तुझ्यावर, नाही ताअी ? ' आतां मात्र हेमा अशी कां बोलते याचा अर्थ विमलला जाणवूं लागला. ती मनांत जरा चरकली आणि शरमली सुद्धां.

' चोवीस तासांचा वियोग सुद्धां त्यांना सहन होत नाही, बाअी ! ' हेमा खंवचटपणानें बोलली. विमलच्या हृदयावर हा वज्राघातच होता. ती पांढरी फटक पडली. ' हेमा जागी होती तर ! ' असा विचार तिच्या मनांत आला.

त्यांचा चहा झाला. हातपाय गळून गेल्यामुळें विमल पाटावर बसून राहिली होती. थोड्या वेळाने हेमा म्हणाली, ' ताअी, तूं जरा तरी विचार केलास का ? ज्या पलंगावर मी प्रथम निजलें होतें आणि येथें आलें म्हणजे नेहमी निजतें, त्या ठिकाणीं बाळासाहेब नेमके कसे आले ? ' विमल तिच्याकडे टकमकां पहातच राहिली.

' पहातेस काय, ताअी ? त्यांना खात्री होती मीच त्या पलंगावर असेन म्हणून. ' हेमा मिस्किलपणें हंसली.

विमलच्या डोक्यांत पूर्ण प्रकाश पडला. ती विचारशून्य झाली. तिला तें सहन होअीना.

'सांगतें, अैक. दोन वर्षांपूर्वी मी येथें आलें होतें, नि दुसऱ्या दिवशीं लगेच मी हट्टानें निघून गेलें. तुला आश्चर्य वाटलें आणि त्याच वेळीं मी तुझा भ्रमनिरास करणार होतें. पण मीच तुला खोटी वाटलें असतें.'

'म्हणजे? त्या रात्रीं...' विमलला आश्चर्य वाटून तिने विचारलें.

'होय, ते हलकेच तेथें आले, त्यांनी मला उठवली. मी घाबरून गेलें, माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला.'

'पण मला तरी हांक मारायची होतीस?'

'उपयोग काय? तुझ्यासारख्या भावड्या स्त्रीने मलाच दोष दिला असता. मीच बाळासाहेबांना मोहांत घातलें असें तुला वाटलें असतें. त्या वेळीं ती गोष्ट षट्कर्णी करण्याजोगी नव्हती. मला व्यवहार समजतो.' हेमा निःशंकपणें बोलली.

'मग?' विमलच्या त्या शब्दाचा अर्थ हेमाने ओळखला.

'मग काय? मी काय करणार?' ती उद्वेगाने उत्तरली. आणि जरा वेळ थांबून हंसली.

'हंसतेस हेमा?' विमलला आश्चर्य वाटलें, संतापही आला.

'हंसू नको तर काय? अेवढे मोठे शहाणेसुरते पुरुष, नि अेवढ्या लहानशा गोष्टींसाठीं सर्व कांही विसरतात. मूर्ख नाहीतर!'

'पण तूं कडी लावली नव्हतीस?'

'ती सैल आहे नि बाजूच्या गजांतून हात घालून ती काढतां येते, हें तुला माहीत नसेल, पण त्यांना होतें.'

'पण मला सांगायचंस तूं. दुसऱ्याच दिवशीं जायचं नव्हतंस. मी तुला माझ्या शेजारीं झोपायला जागा दिली असती.'

'मला दुसरीच धास्ती वाटत होती. बाळासाहेबांचा चेहरा गोबरा आहे, मला ते आवडत नाहीत. मला रावसाहेबांसारखीं सुंदर मुलें व्हावीं असें वाटतें. मी घरीं गेल्याबरोबर डॉक्टरांना भेटलें आणि शंका फेडून घेतली.'

'तशींच मुलें होतील तुला, हेमा. अजून तूं लहान आहेस.' मातेच्या प्रेमाने विमल उद्गारली.

'आणखी दोनतीन वर्षें नको आहेत व्हायला मला तीं. मला माझें जीवन आनंदांत घालवायचें आहे–अेकटीनेच.'

'म्हणजे?' विमलला तिच्या बोलण्याचा अर्थ कळेना.

'सरळ गोष्ट आहे ती. मी काळजी घेतें. पण येथें माझ्यावर बाळासाहेब असा प्रसंग आणतील अशी कल्पना नव्हती, म्हणून मी काळजी घेण्याची सामग्री आणली नव्हती.'

'अस्सं!' विमलला आतां कल्पना आली. यावर कांही वेळ कोणीच बोलले नाहीं. नंतर हेमा म्हणाली,

'बरं ताअी, आतां तूं काय करणार आहेस?'

'भेटले म्हणजे विचारणार आहें त्यांना मी.' विमल सात्विक रागाने उद्गारली.

'मला वाटलंच होतं तें, पण तूं तसें कांही करूं नकोस. मला काय वाटेल त्याच्या पुढें उभी राहतांना? मलाच अेकटीला ती गोष्ट माहीत आहे असं त्यांना वाटतंय्, तोंपर्यंतच मला त्यांच्याशीं मोकळेपणाने वागतां येअील, नाही का? शिवाय ते तुझा द्वेष करूं लागतील.'

'त्यांना अद्दल नको का घडायला?'

'सारें कांही मनांत ठेवून त्यांच्यावर काकदृष्टीने पाळथ ठेवावी. तशी आपल्यावर पत्नीची पाळथ आहे या भीतीने पुरुष सहसा मर्यादेबाहेर जात नाहीत. बाकी हें असेंच चालायचें! पत्नीचा सामना पुरुषांना करतां येत नाही, ते लवकर पराजित होतात. मग ते कोडगे बनतात अन् मन मानेल तसे वागूं लागतात. तुझा संसार उध्वस्त व्हावा असें तुला वाटतें का?'

'मी करूं तरी काय, मग? माझ्या मनाला शांति मिळायची नाही.' विमल आतां हताशपणें रडूं लागली.

'आपल्याला जें समजलें आहे, तें समजलें नाही असेंच आपण पतीला

भासवलें पाहिजे. अशा नाटकी वागण्यानेच आपला निभाव लागेल. घरीं रावसाहेबांशीं मी अशीच हंसत खेळत वागतें.' आपण भलतेंच बोलून गेलों असें पाहून हेमा अेकदम थांबली.

'काय अैकतें आहें मी हें, हेमा?' विमलला अचंबा वाटला. तिला तें खरें वाटेना. हेमाने उत्तर द्यायचें टाळलें.

'रावसाहेब त्यांतले नाहीत अशी माझी खात्री आहे.' विमलने आपला विश्वास व्यक्त केला.

'बाळासाहेबांची तुला अशीच खात्री होती. तिचें काय झालें? त्यांतून तुला परके असलेल्या रावसाहेबांची खात्री तूं द्यावीस, ताअी?'

'सगळेच पुरुष सारखे नसतात कांही.'

'तसें असेलही, पण आमच्या घरीं घरकामें करणारी चांगल्या चेहऱ्याची तरणीताठी बाअी टिकून राहिली आहे तें कां, हें मला माहीत आहे. नि तें तुला कळलं हेंही ठीक झालें. आतां निदान माझ्या सुखाचा तूं हेवा करणार नाहीस.

---

# गांधीवादाची दुर्दशा

गांधीवादाची आज काय स्थिति आहे हें दर्शवणारें किशोरलालजी मश्रूवाला यांनीं २६-५-५२ ला लिहिलेलें अेक पत्र पाटणा येथील 'झाडू' च्या अेका विशेषांकांत प्रसिद्ध झालें असून तें 'संगम' नामक हिंदी मासिकांत उद्धृत केलें आहे, त्याचा अनुवाद पुढें दिला आहे. हे गृहस्थ 'हरिजन सेवक'चे संपादक होते आणि गांधींचे बौद्धिक उत्तराधिकारी होते, तेव्हां या पत्राचें महत्व वाचकांच्या लक्षांत येअील. ते म्हणतात,

'आमची विचारधारा लोकांच्या गळीं उतरवण्यांत आम्हाला यश येत नाही. चरखा किंवा चक्की चालवणें लोकांना आवडत नाही. खादी महाग

पडते, किंवा चरखा–चक्की चालवण्यांत वेळ जातो, अवढेंच याचें कारण नाही. आसपासच्या लोकांवरून मला असें दिसतें की ज्यांनी लहानपणापासून हीं कामें केलेलीं आहेत, जे आश्रमांत वाढले आहेत, आणि ज्यांना वेळही कमी नाही आणि स्वस्त–महाग हा प्रश्न ज्यांना नडत नाही, ते देखील चरखा-चक्की चालवण्यांत उत्साह दाखवींत नाहीत. कित्येकांनी खादी देखील सोडून दिली आहे. कित्येकांना असेंही वाटतें की ग्रामोद्योग वाढले पाहिजेत, विकेंद्रीकरण झालें पाहिजे, परंतु ते म्हणतात की जमाना आमचे विरुद्ध आहे. याचा अर्थ अितकाच की श्रद्धा नाहीशी झाली आहे. कित्येक तर विचारपूर्वक आमचे विरुद्ध फिरले आहेत. कित्येकांनी जरी खादी सोडली नसली, तरी अेखादा अश्रद्धाळू झालेला ब्राह्मण जसा जानवें आणि शेंडी ठेवतो, तसेच कांही लोक अेक संस्कार म्हणूनच खादी वापरतात, श्रद्धा आहे म्हणून नव्हे. चरखा त्यांना आवडत नाही.

‘ खेड्यांत चरख्याचा प्रचार करायला कोणी गेला, तर त्यांत किती लोकांना आकर्षण वाटतें ? समजा की तुम्ही अेक राजकीय पक्ष काढतां आहां आणि लोकांना सांगतां आहां की आम्ही लोकांना चरखा चालवण्याची आणि खादी वापरण्याची सक्ती करूं, पिठाच्या आणि धान्याच्या गिरण्या बंद करूं, तर लोक विचारतील की तुम्ही खादी काय भावाने द्याल, तांदूळ काय भावाने द्याल, दळण्याचें मोल काय घ्याल ? आणि यावर तुम्ही म्हणाल की खादी घरांत उत्पन्न करायची असते आणि जर विकतच घ्यायची असेल तर ती महागच पडेल, दळणें आणि सडणें हीं तर घरचीं कामें आहेत, तेव्हां भाव कसा विचारतां ? पण दुसरा पक्ष सांगेल की आम्हाला मतें द्या, म्हणजे आम्ही गिरणीचें कापड स्वस्त करूं, पवनचक्की किंवा विजेची चक्की लावून अेक पैशांत दहा शेर गहूं दळून देऊं आणि प्रत्येक गांवांत अेक सिनेमा पण उघडूं. असें झालें तर लोक कोणाला मतें देतील ? कांही लोक कदाचित् कबूल करतील की आमचे विचार फार चांगले आहेत, पण मतें मात्र आम्हाला मिळणार नाहीत.

'आम्हाला जर अेखाद्या गांवांत दहावीस टक्के लोक देखील आमच्या मताप्रमाणें वागायला तयार करतां येत नाहीत, तर आमचेंच काम कचें समजलें पाहिजे आणि सरकारी आश्रयाच्या अभावावर भर देतां कामा नये. आमचें अिमान आणि चालचलणूक जर उच्च दर्जाची असतील तर लोक आमचे पाय धरतील, पण आम्हाला मतें मात्र देणार नाहीत. चांगल्या माणसांचीं चुकीचीं मतें देखील ते अैकून घेतील, पण आपलीं स्वतःचीं मतें चुकीचीं आहेत असें ते मानणार नाहीत.

'अिमान व नेकी यामुळें देखील अेक प्रकारचा अहंकार उत्पन्न होतो आणि आमच्या कार्यकर्त्यांना त्याचीच बाधा झाली आहे. यामुळेंच कार्यकर्त्या व्यक्तींचें किंवा संस्थांचें अेकमेकांशीं पटत नाही. या कार्यकर्त्यांत आज गांधींचा अनुयायी कोण आहे! विनोबाजींचे आहेत, काकासाहेबांचे आहेत, जाजूजींचे आहेत, कुमारप्पांचे आहेत, कदाचित् मश्रूवालाचेही असतील, पण गांधींचे कोणी नाहीत, कारण हे सर्व तसे असते, तर त्यांचे विचार जुळले असते, आवडनिवड जुळली असती, अेकमेकांत बंधुत्व व आदरभाव असता, अविश्वासाला जागा राहती ना.' हे कोणा विरोधकाचे शब्द नाहीत, गांधींच्या पक्षाचें समर्थन करणाऱ्या अेका वकिलाचे आहेत, यावरून काय दिसतें?

---

# प्रियकराला विषप्रयोगाने मारणारी मॅदलेन

## (अेका खटल्यावरून सुचलेले विचार)

लेखक, अेक डाक्तर

प्रणयचेष्टांबद्दल प्रसिद्धि पावलेली अेका कारागिराची सुंदर मुलगी मनासारखा तरुण मिळाल्याबरोबर प्रेमाचे चोरटे चाळे मनसोक्त करूं लागते व ते कमाल मर्यादेपर्यंत पोंचल्यानंतरही त्यांतून कांहीच निष्पन्न न झाल्या-मुळें स्वाभाविकच त्यांना ओहोटी लागते व अशा वेळीं अेक श्रीमंत व समा-

जांत मानमान्यता असलेला तरुण तिला मागणी घालून आयुष्याचें गोड स्वप्न तिच्यापुढें उभें करतो.

प्रेमाचे चोरटे व थिल्लर प्रकार दोघांना कोठपर्यंत आकर्षून ठेवणार ? अर्थात् त्यांची परिणति लग्न किंवा, बेकायदेशीर कां होईना, मूल होण्यांत झाली असती, तर सर्वच कथाभाग निराळा लिहावा लागला असता. पण दोघांनीही, परिस्थितीच्या विषमतेमुळेंही असेल, लग्नाचा विचारच केलेला दिसत नाही. लांग्लिअे हा उल्लूच म्हणायचा. प्रेमाच्या चोरट्या थिल्लर प्रकारांवर तो खुष राहिला. सारांश अविचारावर व उल्लूपणावर उभारलेली प्रेमाची अिमारत प्रेमपत्रें, भेटीगांठी व अितर चोरटे व्यवहार यांनी शोभिवंत व आल्हादकारक वाटली, तरी तिचा पाया कच्चा असल्यामुळें तो ढांसळली व दोघांचाही सर्वनाश झाला.

तिनें जीं पत्रें लिहिलीं व स्वतःला त्याची पत्नी व त्याला पति म्हणण्यापर्यंत मजल मारली, तेंही तिच्यांत असलेली लैंगिक भूक, थिल्लर वृत्ति व उल्लूपणा आणि आत्यंतिक भावनोद्दीपकता, याचेंच द्योतक नाही का ? तिचें वय, तिच्याच मनःस्थितींतला तिला मिळालेला तरुण, या गोष्टी लक्षांत घेतां वास्तविक हें कांहीच नव्हे असें वाटतें. ' आग्रा डबल मर्डर केस ' मध्यें तर अशा तऱ्हेचीं ४०० पत्रें पुराव्यांत दाखल झालीं व तीं सर्व प्रेमाचे सोहळे मनासारखे करून लग्न केलेल्या स्त्रीनें लग्नाच्या नवऱ्याचा कांटा काढून टाकण्याकरतां आपल्या प्रियकराला लिहिलेलीं होतीं.

आज आपण पहात असलेलीं दृश्यें शंभर वर्षांपूर्वी नजरेने दिसत नसलीं तरी प्रेमाचे चोरटे किंवा उघड प्रकार चालत नव्हते असें मात्र नव्हे. उलट त्यांत आजच्या पेक्षां जास्त भरींवपणा होता. समाजांतील प्रतिष्ठित लोक घरांत विवाहित पत्नी असतांनाही आपल्या प्रेमपात्राला घरीं आणायचे, किंवा सायंकाळीं कचेरींतून अगर कामावरून आल्यावर काठी फिरवीत आणि चपला उडवीत पट्टी खायला आणि गाणें अैकायला जायचे. हें लेखकानें चाळीस वर्षांपूर्वी पाहिलें आहे. लोकांत त्याची फारशी चर्चाही होत नसे,

कारण बहुतेक सर्वजण–ज्यांना अशा आडमार्गानें पैसे खर्च करायची ऐपत असे–त्यांतलेच असत. अर्थात् ही मीं पाहिलेली परिस्थिति हिंदुस्थानांतली आहे.

पुढील आयुष्याचें गोड स्वप्न व आतांपर्यंत आपण केलेल्या चोरट्या व्यवहारांवर अनायासें पांघरूण घालतां येईल असें दिसल्याबरोबर मॅदलेनची धुंदी उतरली व तिचें मन नव्या जगांत वावरूं लागलें. अर्थात् त्याकरतां लांग्लिअेची अडचण बाजूला करणें क्रमप्राप्त होतें. तिने पत्राने त्याला दूर सारण्याचा प्रयत्न केला, पण तोही कच्चा नव्हता. त्याने तिचा मनसोक्त आस्वाद घेतला होता, त्यामुळें तिला सोडणें त्याला कसें शक्य होतें? त्याने उलट तिच्या बापाला पत्रें दाखवण्याचा धाक घातला. स्त्रीहृदयच तें! ती घाबरली, पण फारच थोडा वेळ. लगेच तिला उपाय सुचला व मी भेटेपर्यंत तरी स्वस्थ रहा, असा पर्याय काढून आणि थापाथुपी करून त्याला चूप बसवलें. लेखकाला याचें आश्चर्य वाटतें, पण लांग्लिअेसारख्या उल्लू माणसाला मॅदलेनसारख्या धूर्त व चलाख पोरीने चकवणें कांहीच कठिण नव्हतें.

अेवढें करूनच ती स्वस्थ बसली नाही. पुन्हा पहिल्या प्रकारांची उजळणी तिने सुरू केली. थंडींत कुडकुडत खिडकीच्या बाहेर उभा राहून कोको पिण्याची त्याला संवय होती. त्यांतच विष घालून तिने त्याचा कांटा काढला. पण ती स्वतःही फसली.

अेवढा सरळ प्रकार असतांना जज्ज व जूरी यांना तिला अपराधी ठरवतांना अडचण कां भासली समजत नाही. चौकशीबद्दल लिहिणें नकोच. ती ठरलेल्या मार्गानेच होते व त्यांत अक्कलेपेक्षां शिरस्त्याचाच भाग अधिक असतो. वकीलही ठरलेले प्रश्न विचारतात. मी जज्ज नाही, पण अनेकदां त्यांच्या समोर उभा राहिलों आहें. जज्ज व जूरी अेकदां आपआपल्या खुर्च्यांत बसले कीं आजूबाजूचें व आपल्या पायाखालचेंही त्यांना कांही दिसत नसावें असें वाटतें.

तिचीं प्रेमपत्रें त्यांना भरमसाट मोलाचीं वाटलीं व त्यांतील प्रत्येक शब्द त्यांनी सोन्यासारखा तोलला. पण त्याबरोबरच प्रणयचेष्टांविषयीं प्रसिद्ध असलेल्या १७ ते २१ वर्षांच्या उल्लू व थिल्लर पोरीच्या प्रेमाचीं तीं पत्रें म्हणजे पोरखेळच होता, अेवढेंच नव्हे तर ती प्रेमपत्राचे धडे गिरवीत असावी, अशी शंकाही त्यांना आली नाही. तसें नसतें व तीं सर्व पत्रें प्रामाणिकपणाचीं द्योतक असतीं, तर अेका श्रीमंत तरुणाने मागणी घातल्या-बरोबर पहिल्या प्रियकराला ताबडतोब सोडायला ती तयार होतीना.

---

# ग्रंथपरीक्षण

१. **सत्यलोक यात्रा**. लेखक, स्वामी सत्यभक्त. प्रकाशक, सत्याश्रम, वर्धा. पृ. १४३. किंमत दीड रुपया.

स्वामीजी त्यांच्या हल्लीच्या भूमिकेपर्यंत कसे पोंचले, याचें रूपकात्मक वर्णन या पुस्तकांत आहे. या वर्णनाकडे विज्ञानाच्या दृष्टीने न पाहतां काव्याच्या, कल्पनाविलासाच्या दृष्टीने पाहिलें पाहिजे, असा अिशारा लेखकाने प्रारंभींच दिला आहे. सत्येश्वर नांवाचा अेक देव कल्पून, त्याच्याकडे जाऊन संदेश घेऊन आल्याची हकीकत या पुस्तकांत दिली आहे. वाटेंत त्यांना जातिभेद, रूढि वगैरे अनेक राक्षसांशीं युद्ध करावें लागलें आणि अनेक धर्मसंस्थापकांशीं त्यांनी चर्चा केली व त्यांच्याकडूनही संदेश घेतले. हे सर्व संस्थापक आणि आणि अनेक देव, देवी त्यांना सत्येश्वराच्या दरबारांत दिसलीं. सत्येश्वराने त्यांना 'सत्यभक्त' हें नांव बहाल केलें. त्यांनी राम, कृष्ण, महावीर, बुद्ध, अीसा ( येशू ख्रिस्त ) मुहम्मद, मार्क्स व जरथुस्त, यांच्या मुलाखती घेतल्या व या सर्वांनी अर्थात् स्वामीजींना पसंत असलेल्या मतांचाच पुरस्कार केला. कृष्णाने स्वतःची कैफियत मांडली की मी गोपींशीं फक्त क्रीडा करीत होतों, म्हणजे खेळत होतों. त्याचा लोकांनी भलताच अर्थ केला आहे हें त्याला माहीत नव्हतें. मार्क्सने जरी धर्माला अफूची गोळी म्हटलें असलें, तरी

अितर धर्मसंस्थापकांबरोबर त्यालाही सत्येश्वराच्या दरबारांत मानाचें स्थान मिळालें होतें, तेव्हां आतां त्याचीं धर्मासंबंधी मतें काय आहेत, हें जाणण्याची उत्कंठा स्वामीजींना लागून राहिली होती. पण त्याने सांगितलें की मी खऱ्या धर्मांचा, किंवा सत्येश्वराचा विरोधी कधींच नव्हतों. म्हणून तर मला सत्येश्वराच्या दरबारांत जागा मिळाली आहे. ही रूपकात्मक कथा स्वामीजींच्या काव्यमय लेखनशैलीने विशेष आकर्षक झाली आहे व ती आस्तिकांना व नास्तिकांनाही वाचनीय वाटेल यांत शंका नाही. **र. धों. क.**

---

# पत्रव्यवहार

१

मी आपल्या मासिकाचा वर्गणीदार झालों आहें. जोडूनच चार संस्कृत श्लोक पाठवीत आहें, त्यांचा अर्थ आपल्या सवडीप्रमाणें पुढील कोणत्याही अंकांत देण्याची कृपा करावी. आपला ० ० ०

उ. वाचकांना संस्कृत शिकवणें हें कार्य आमच्या कक्षेंत येत नाही असें वाटतें. कोणाही संस्कृत शिक्षकाला विचारल्यास आपलें काम होअील. **सं.**

२.

२१–१२–५२ च्या लोकसत्तेंत ‘ सैनिकाचें सुंदर रमणींत रूपांतर ’ या मथळ्याखालीं न्यू यॉर्क येथील सव्वीस वर्षें वयाच्या सैनिकाचें स्त्रींत रूपांतर झाल्याची हकीकत आली आहे. हें रूपांतर होण्यापूर्वी त्याला पांच वेळां मोठ्या व अेक वेळ लहान शस्त्रक्रिया करावी लागली व दोन हजार अिंजेक्शनें द्यावीं लागलीं, अशीही माहिती दिली आहे व अद्याप अेक मोठी शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. या बाबतींत प्रस्तुत लेखकाला आलेला अनुभव येथें देत आहें. नागपूर येथें घडलेली ती घटना आहे व ती अनेक वृत्तपत्रांतून ती प्रसिद्धही झाली आहे. नागपूरला अेका वैश्य घराण्यांत १५–१–२६ रोजीं अेका मुलीचा जन्म झाला. सदर मुलीचें शिक्षण मुलीं-

च्याच शाळेंत झालें. सोळावे वर्षी सदर मुलीची शारीरिक परीक्षा करण्याचा प्रसंग मजवर आला, तेव्हां ती मुलगी नसून मुलगा आहे असें आढळलें, पण तिच्यांत असलेलें पुरुषत्व बाहेर येण्याकरतां कांही उपचारांची गरज होती व म्हणून मीं १९-७-४१ रोजीं होमिओपथीचा उपचार सुरू केला. दोन वर्षांत तिचें पूर्ण रूपांतर झालें व 'अिंदिरेचा अिंद्रजित् झाला' या मथळ्याखालीं ती हकीकत १९४१ व ४३ सालीं अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. सदर अिंद्रजित् आज सुमारें २८ वयाचा आहे. उपचारापूर्वीचे व नंतरचे फोटो प्रस्तुत लेखकाजवळ आहेत, ते जिज्ञासूंना पहावयास मिळतील. यावरून दिसून येअील की अशा तऱ्हेची विकृति दूर करण्याकरतां शस्त्रक्रियेचीच जरूर असते असें नाही. औषधोपचारानेही अिच्छित परिणाम घडवून आणतां येतो असा आमचा अनुभव आहे. पत्ताः—डी. डी. अेल्. राजाभोज् अेम्. डी., अेम्. अेस्., अेच्., अेस्. राजा बिल्डिंग, नाअिक रोड, सर्कल ४, नागपूर.

उ. ही हकीकत पूर्वी याच मासिकांत (जानेवारी १९४२) येऊन गेली आहे. ही हकीकत ज्यांत प्रसिद्ध झाली अशा अनेक वृत्तपत्रांची यादी लेखकाने दिली आहे, ती येथें देण्याची जरूर दिसत नाहीं. सं.

---

# शारदेचें पत्र

येथल्या 'टाअिम्स' मधें कधींकधीं मोठ्या गमतीचीं पत्रें येतात. जयराज नांवाचे अेक गृहस्थ लिहितात की प्रो. लवांदे यांनी भारतीय तत्वज्ञानावर जो हल्ला चढवला आहे, त्याचें सार अितकेंच की त्यांत तर्कशुद्ध विचारसरणी सांपडत नाही. हे गृहस्थ म्हणतात की तर्काचा आधार घेऊन कोणतेंही विधान केलें, तरी त्याला उत्तर हें असतेंच, तेव्हां अशा वादाने अंतिम सत्य सांपडण्याचा संभव नसतो. तेव्हां त्या भानगडींतच न पडतां सुसंगत विचाराच्या दृष्टीने वेद हे तर्कशास्त्राच्या पलीकडचे आहेत असेंच

मानणें भाग आहे. शंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्रावरील टीकेंत असेंच केलें आहे. या गृहस्थांना तर्कशास्त्र कशाशीं खातात हें तरी माहीत नसावें, किंवा माहीत असूनही त्यांत आपला किंवा वेदांचाही निभाव लागणार नाही हें समजून ते असें म्हणत असावेत. ते पुढें म्हणतात की तर्कशास्त्र प्रो. लवांच्यांच्या पाश्चात्य मित्रांवरच सोंपवावें, कारण तर्कशुद्ध वादाचा कधीं अंतच लागत नाही. तेव्हां तर्काच्या भानगडींत न पडतां भारतीयांनी उपनिषदें, भगवद्गीता आणि शंकराचार्यांचे ग्रंथ यांवर श्रद्धा ठेवावी हेंच बरें. भारतीय मूर्ख आहेत, तेव्हां त्यांनी तर्क करीत बसूं नये, असें या गृहस्थांचें म्हणणें दिसतें, पण सर्वच भारतीय त्यांच्या अितके मूर्ख असतील असें मला वाटत नाही. धर्म हा तर्कशास्त्राच्या पलीकडचा आहे, असें धार्मिक लोक नेहमीच म्हणतात. तर्क करूं लागलें तर धर्म कोलमडून पडेल अशी त्यांना नेहमी भीति वाटत असते, पण श्रद्धा ठेवण्याकरतां आंधळेपणा पतकरावा लागतो, तो निदान मला तरी नको आहे.

अेका बाअीचें शंभराव्या वाढदिवसाला केलेलें विधान प्रसिद्ध झालें आहे की पाणी कधींही पिऊं नये. याप्रमाणें यागणारे पुष्कळ लोक यूरोपांत आहेत आणि पाणी हें धुण्याकरतांच असतें, पिण्याकरतां नव्हे, अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते. चहा, काफी, मद्य, वगैरे पेयांनीच ते तहान भागवतात आणि तरी ते शंभर वर्षांपर्यंत जगूं शकतात असें दिसतें. अर्थात् ते दारू प्याले नसते तर अधिक जगले असते, असें म्हणतां येअील, पण दारू न पिणारे तरी शंभरांच्या वर जगणारे कितीसे असतात? जगांत सर्वांत जास्त जगणारे लोक स्कॉटलंडमध्यें सांपडतात, पण ते तर व्हिस्की पिण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. मी व्हिस्की नियमाने पिण्यामुळें जास्त जगलों, असेंही कांही म्हाताऱ्यांनी सांगितलेलें आहे, पण निदान व्हिस्की प्याल्याने मनुष्य लवकर मरतो असें नाही, अितकें तरी कबूल केलेंच पाहिजे. यावरून दारूबंदी-वाल्यांची ओरड खोटी आहे हें उघड दिसतें. अर्थात् कोणत्याही प्रकारच्या अतिरेकानें मनुष्य मरेल यांत नवल नाही. परंतु अतिरेक न करण्याअितकी

अक्कल ज्यांना असते, त्यांचें कोणतेंही नुकसान दारू प्याल्यामुळें होत नाही असें स्कॉटलंडच्या उदाहरणवरून दिसतें.

अ. भा. कां. स. च्या हैद्राबादच्या अधिवेशनांत शेवटीं नेहरूंनी आपला हट्ट चालवलाच आणि पंचवार्षिक योजना पुरी होओपर्यंत भाषावार प्रांतरचनेचा विचारच करायचा नाही आणि आंध्राचें काय होतें तें पाहूनच पुढचा विचार करायचा असा ठराव केला. अर्थात् आंध्रचा कांही भाग हैद्राबादेंत अडकला असल्यामुळें हैद्राबादची विभागणी केल्याशिवाय आंध्र प्रांत बनतच नाही आणि हैद्राबादचें काहीच करायचें नाही असा नेहरूंचा विचार दिसतो, तेव्हां भाषावार प्रांतरचनेला नेहरू शक्य तितके अडथळे आणणार हें स्पष्ट दिसतें आहे. तरी पण काकासाहेब गाडगीळ देखील त्यांच्या आहारीं गेल्यासारखे दिसतात, कारण हा ठराव त्यांनीच मांडला. नेहरूंच्या हातीं सत्ता आहे तोंपर्यंत भाषावार प्रांतरचना होत नाही असा याचा सरळ अर्थ दिसतो.

यंदांचा नाट्यमहोत्सव साहित्यसंघाच्या स्वतःच्या जागेंत झाला. संघाने बसवलेल्या नाटकासंबंधी तालमींची कमतरता, नक्कल पाठ नसणें, वगैरे नेहमीचे दोष होतेच, पण त्यांतल्या त्यांत केशवराव दात्यांसारख्यांना देखील जुन्या नाटकाची नक्कल पाठ नसावी हें आश्चर्य आहे. अेकंदरींत चांगलीं म्हणण्यासारखीं दोनच नाटकें झालीं आणि तीं पुण्याच्या सोशल क्लबने बसवलेलीं होतीं. पैकीं म्युनिसिपालिटी हें लोकांच्या ओळखीचेंच होतें. 'अंमलदार' मात्र नवीन होतें आणि त्याचें सर्व श्रेय श्री. पु. ल. देशपांड्यांना दिलें पाहिजे. त्यांनीच तें लिहिलें ( म्हणजे अनुवाद केला ), त्यांनीच मुख्य भूमिका उत्तम केली आणि त्यांनीच दिग्दर्शन केलें होतें. म्युनिसिपालिटी मधें देखील कांही कंटाळवाण्या भागाला कातरी लावल्यामुळें सुधारणा झाली. पुण्यप्रभाव नाटकांत कांही पुरुष नट स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांपेक्षां चांगल्या करून दाखवणार अशी बोलवा होती, पण तें नाटक साफच पडलें. खडाष्टक नाटक पाडण्याचा राजन यांनी कसून प्रयत्न केला, परंतु त्यांत अितर पुष्कळ

महत्वाच्या भूमिका असल्यामुळें तें त्यांना साधलें नाही. त्यांच्या अंगीं नायकाला साजेसे कोणते गुण आहेत याचा उलगडा होणें कठिण. ' लग्नाची बेडी ' हें नाटक नवें नाही आणि याच नटसंचानें बऱ्याच वेळां केलेलें आहे, तरीही तें वठावें तसें वठलें नाहीं. याचें अेक कारण म्हणजे रश्मीची भूमिका या वेळीं सुलोचना नगरकर ( पालकर ) यांना दिली होती. कोणतीही स्त्रीभूमिका कोणत्याही स्त्रीला करतां आलीच पाहिजे असें नाही, हें नटसंच ठरवतांना लक्षांत घेतलें पाहिजे. म्हतारपणीं बालगंधर्वांनें रुक्मिणीची भूमिका करण्यांत जितकें अनौचित्य आहे, तितकेंच रश्मीची भूमिका या बाअींकडे देण्यांत होतें. यावरून आणखी अेक गोष्ट सुचली ती म्हणजे दुर्गाबाअी खोटे यांचें काम जरी सामान्यतः चांगलें होतें, तरी खडाष्टकमधलें त्यांचें काम या वेळीं तरी अति झालें असें पुष्कळांचें मत आहे.

साहित्यसंघानें श्री. शिरवाडकरांना दर वर्षी अेक नाटक पुरवण्याचा मक्ता दिल्यासारखा दिसतो, तो कां याचा उलगडा मला झाला नाही. त्यांचें खरोखर चांगलें झालें असें अेकच नाटक म्हणजे ' दूरचे दिवे ' आणि तें भाषांतर होतें. त्याचें दुसरें भाषांतर ' वैजयंती, ' यांत त्यांनी मूळ नाटककारावर अत्याचार केला, तरीपण तें नटांनी सावरून धरलें. त्यांचें स्वतःचें पहिलें नाटक ' दुसरा पेशवा ' हें यशस्वी झालें नाही आणि यंदांचें ' कौंतेय ' हें तर साफच पडलें, नटांनाही तें सांवरून धरतां आलें नाही. साहित्यसंघानें तें पुन्हां कशाकरतां केलें हें समजलें नाही. मामांचें पहिलें नाटक 'कुंजविहारी' यंदां तीस वर्षांनंतर पुन्हां झालें असें म्हणतात आणि तें लोकांना बरेंच आवडलें. कृष्णाचें काम करणारी मुलगी कुमारी गुर्जर ही अितकें चांगलें गाअील अशी कल्पना नव्हती व विजया देसाअींच्या गाण्यांत व अभिनयांत देखील बरीच सुधारणा झालेली दिसली. गाण्याचे बाबतींत राम मराठे हळदणकरांपेक्षां जास्त संयम दाखवतात म्हणून बरें, नाहीतर नाटक आणखी कापावें लागलें असतें. भालचंद्र पेंढारकरांनीही पेंद्याचें काम संयमानें केलें, पण त्यांची गणना कसलेल्या नटांतच केली पाहिजे.

तुझी **शारदा**

**समाजस्वास्थ्य** मासिक दर १४ तारखेला टपालांत पडतें. वर्गणी रु. ३, व्ही. पी. ने रु. ३-६-०

## आमचेकडे मिळणारा माल

**लॅंबट डच कॅप,** रु. ६. **अमेरिकन,** रु. ८. **उभट टोपी,** रु. १॥. **कॉंट्रॅसेप्टॅलीन** ( देशी जेली, मोठी नळी ) रु. ३. **कोरोमेक्स जेली** (अमेरिकन, मोठी नळी) रु. ४. **पिशव्या,** प्रत्येकीं ६ आणे, ८ आणे, १ रु. **भोंवऱ्याची पिचकारी,** रु. ७. **राअिटयूब** ( रोगप्रतिबंधक ), रु. १, डझनास रु. ११.

**राइट एजन्सी,** १३ भटवाडी क्रॉस लेन, मुंबई ४.

**आयुर्वेद सेवा संघ, नाशिक,** या संस्थेने तयार केलेल्या **धातुपौष्टिक वड्या " कंदर्प वृष्य पाक ".**

अर्धा शेर पाकांत सुमारें ४० वड्या येतात. १ वडी सकाळीं व १ वडी रात्रीं झोंपतांना, याप्रमाणें २० दिवस हें धातुपौष्टिक औषध खाऊन वर कप, अर्धा कप दूध पीत जावें. अेक रत्तल वड्यांची किंमत ट. खर्चासह रु. ७-१४-०. मुंबईतील विक्री केंद्रें :- ( १ ) दि सूर्यकिरण फार्मसी लि०, १७३ गिरगांव रोड, मुंबई-४. ( २ ) सर्वौषधि संग्रहालय, पोलीस चौकी मारुतीजवळ, दादर, मुंबई-२८.

Registered No. B 2289.

## प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें

१. क्लैब्याची मीमांसा, किंमत रु. ६, ट. ५ ८ आणे
२. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु., ट. ख आणे
३. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], ९ वी आवृत्त
किंमत रु. ४, ट. ख. ८ आणे.
४. संततिनियमन [सचित्र], मराठी १० वी किंवा हिंदी २ री आवृत्ति किंमत सवा रुपया, ट. ख. ७ आणे.
५. गुप्त रोगांपासून बचाव, ४ थी आ.रु.१, ट.ख.७आणे.
६. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग २ रा [ वर्षें ४–५–६ ], किं. २–०–०, ट. ख.८ आ.
७. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.
८. गुरुबाजी ( नाटक ), किं. ८ आ., ट. ख. ७ आणे
९. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ८ आ.
१०. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ७ आ.
११. न्यायाचा शोध (नाटक), किं १ रु., ट. ख. ७ आ.
१२. पॅरिसच्या परी (दुसरी आवृत्ति) रु. ३., ट.. ख. ८ आणे

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५ आ.
२. मूळव्याध, किं. ४ आ.

### श्री. शकुंतला परांजपेकृत

1. Three years in Australia, Rs. 3/15. Postage As. 8
२. पाळणा लांबवायचा कीं थांबवायचा, किं. ८ आ., ट. ख. ७ आ.

राइट एजन्सी, नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, मुंबई नं. ४.

मुद्रण स्थळ:—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई–७

मुद्रक व प्रकाशक:—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई–४